अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

सोनेतारण कर्ज प्रति तोळा: 85000 | 12% वार्षिक व्याजदर | दाम दुप्पट ठेव वर्ष 06 | 100 दिवसाच्या ठेवीवर 10%

व्यावसायिक कर्ज सोनेतारण कर्ज | सरकारी नोकरदार कर्ज योजना | दूध समृद्धी कर्ज, ५ लाखापर्यंत मॉर्गेज लोन

संस्थापक, चेअरमन: मा.श्री. अनिलभाऊ इंगवले

एल के पी मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि.सोलापूर

शाखा : निर्मिती लँडमार्क, इंदिरानगर विजापूर रोड सोलापूर मो : 7218622002

शाखा : कृष्णा हाइट्स, ब्रम्हदेवदादा माने बँकेच्या वर पहिला मजला, आसरा चौक, सोलापूर मो.7204552002

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २ सप्टेंबर २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ३३४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

आंदोलन गेले हाताबाहेर गेल्याचे हायकोर्टाचे निरीक्षण | आज दुपारी ४ पर्यंत दक्षिण मुंबई मोकळी करण्याचे आदेश

# मराठा आरक्षणाचे आंदोलन थांबवण्यावर कोर्टाचा आदेश नाही;

# परवानगीच्या निर्णयाकडे महाराष्ट्राचे लक्ष, आज पुन्हा सुनावणी

✔ मुंबई/खास प्रतिनिधी

मराठा चळवळीचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या ओबीसीमधून आरक्षण मिळण्याच्या मागणीच्या आंदोलनावर सोमवार (ता.१) येथील उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान मोठी खडाजंगी झाली. आरक्षणासाठीचे मराठ्यांचे आंदोलन हाताबाहेर गेल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण कोर्टाने नोंदवत राज्य सरकारची खरडपट्टी काढतानाच कानउघडणीदेखील केली. जरांगे-पाटील यांच्या वकिलांनासुद्धा न्यायालयाने खास सूचना केल्या. मंगळवार (ता.२) दुपारी ४ पर्यंत मुंबईमधील परिस्थिती सुधारण्याला मुदत दिली. दक्षिण मुंबई मोकळी करण्याचे आदेशदेखील कोर्टाने यावेळी दिले. हे आदेश देताना मराठ्यांच्या यापुढील आंदोलनाच्या परवानगीबाबत कोर्टाने कोणतेच स्पष्टीकरण दिले नाही. हायकोर्टात मराठा आंदोलन प्रकरणावर आज पुन्हा सुनावणी होत आहे. आंदोलनास परवानगी देण्यात येणार की नाही, याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

दरम्यान कोर्टाच्या आदेशनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे. कोर्टाच्या आदेशाचे पालन सरकारला करावे लागेल ते आम्ही करु असे म्हटले आहे. तर कोर्टाच्या निर्देशानंतर जरांगे-पाटील यांनी नाराजी व्यक्त करीत आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, कोणाचे तरी षडयंत्र सुरु असल्याचे त्यांनी सांगत हुल्लडबाज आंदोलकांना निर्वाणीचा सल्ला दिला आहे. कोर्टाच्या आदेशाचे पालन करा. दक्षिण मुंबई मोकळी करा असे फर्मान आंदोलकांना दिले आहे.

(अधिक वृत्त पान ७ वर...)

**मनोज जरांगेंच्या आंदोलनावरुन हायकोर्टात मोठी खडाजंगी** — **हायकोर्टाकडून सरकारची खडपट्टी, कायदा सुव्यवस्थेवर भाष्य** — **जरांगे-पाटलांच्या वकिलांनादेखील कोर्टाच्या सुचना** — **मनोज जरांगे-पाटील कोर्टाच्या टिपणीवर निराश, हुल्लडबाजांना झापलं** — **कोर्टाच्या आदेशानंतर दक्षिण मुंबईमधील गर्दी ओसरु लागली** — **हायकोर्टात आंदोलकांचा आवाज, सर्वाच्च न्यायालयाने व्यक्त केले आश्चर्य**

### हायकोर्टाच्या राज्य सरकारला 'या' सूचना

- ✔ आझाद मैदानातील सगळ्या आंदोलनकर्त्यांना वैद्यकीय उपचार आणि खाण्याची सोय करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला सांगितले.
- ✔ आंदोलनाला परवानगी नसल्याने कायदेशीर कारवाई करण्यास राज्य सरकार मोकळं, मुंबईत आणखीन आंदोलनकर्ते प्रवेश करणार नाहीत याची राज्य सरकारने काळजी घ्यावी. आणखीन आंदोलनकर्त्यांनी मुंबईत येण्याचा प्रयत्न केला राज्य सरकारने योग्य ते पावलं उचलून त्याचं मुंबईत येणे थांबवावे, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलं आहे.
- ✔ मुंबईतील सीएसटीएम, मरिन ड्राईव्ह, फ्लोरा फाऊंटनसह परिसर आणि दक्षिण मुंबईतून आंदोलकांना हटवा, असे हायकोर्टाचे राज्य सरकारला निर्देश
- ✔ उद्या शाळा आणि कॉलेज बाधित होतील. विद्यार्थ्यांना शाळेत जाता येणार नाही, दुधाच्या, भाजीच्या गाड्या मुंबईत आल्या नाहीत तर काय होईल? उच्च न्यायालयाने सरकारला केली विचारणा

### आंदोलकांच्या वकिलांना 'हे' दिले निर्देश

- ५००० आंदोलकांनाच केवळ परवानगी, २६ ऑगस्टचा उच्च न्यायालयाच्या इतर आदेशाचे तुम्ही पालन करणार का? उच्च न्यायालयाची मनोज जरांगे-पाटील यांच्या वकिलांना विचारणा
- आंदोलनासाठी मुंबईत आलेल्या ५००० पेक्षा जास्त लोकांनी परत जावं, अशा आशयाचं प्रसिद्धी पत्रक तुम्ही काढणार का? उच्च न्यायालयाची आंदोलकांच्या वकिलांना विचारणा
- सामान्य माणसाची आयुष्य पूर्ववत करण्याची गरज, शहर थांबवलं जाऊ शकत नाही, गणेशोत्सव देखील आहे. रस्ते आंदोलनकर्त्यांनी खाली करावेत स्वच्छ करावेत. आझाद मैदानाव्यतिरिक्त सगळी जागा उद्या दुपारपर्यंत खाली करावेत.
- आम्हाला काही फोटो आणि व्हिडिओ दाखवण्यात आले ज्याने स्पष्ट होतंय की मुंबईचे रस्ते अडवण्यात आले आहेत, हायकोर्टाची आंदोलक वकिलांना विचारणा
- आंदोलन हाताबाहेर गेलं आहे, तुम्ही मुंबई थांबवू शकत नाही, रस्ते अडवू शकत नाही. मुंबईची दिनचर्या थांबवू शकत नाही आणि हेच सगळं सुरू आहे

### हायकोर्टाने 'हे' नोंदवलं महत्त्वाचं निरीक्षण

- वर्तमानपत्रात आलेल्या बातमीची मुंबईच उच्च न्यायालयाकडून दखल. मागणी पूर्ण होईपर्यंत आमरण उपोषण करणार तोवर मुंबई सोडणार नाही असा बातमीत उल्लेख. तर, वर्तमान पत्रातील कबड्डी खेळतानाच्या फोटोची देखील उच्च न्यायालयाकडून दखल
- सिग्नलवर नाचणाऱ्या आंदोलकांचा व्हिडिओ उच्च न्यायालयात दाखवण्यात आला
- आंदोलनकर्ते आंदोलक संयोजकांच्या कंट्रोलमध्ये नाहीत. मुंबईतील वानखेडे आणि ब्रेबॉन स्टेडियम दोन्ही मैदान ऐतिहासिक आहेत, आंदोलनकर्ते त्यांच नुकसान करतील, मैदानावर झोपतील.
- मुंबईत संपूर्ण उच्च न्यायालय परिसराला घेराव घालण्यात आला आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या गाड्या अडवण्यात आल्या आहेत, त्यांना उच्च न्यायालयात येण्यापासून अडवण्यात आल्याचं न्यायमूर्तींकडून स्वतः सांगण्यात आलं.

### 'सरकारला 'ईगो'नाही, पर्याय काढण्याची तयारी, न्यायालयाच्या आदेशाचे पालक करु'



मुख्यमंत्री सर्व कायदेशीर पर्यायांवर विचार करण्यात आला. हे कायदेशीर पर्याय न्यायालयात कसे टिकू शकतील, यावर चर्चा झाली. या संदर्भात अधिकची माहिती मागवण्यात आली आहे. ती माहिती मिळाल्यानंतर पुन्हा एकदा बैठक घेतली जाईल. कायदेशीर मार्ग शक्य असल्यास ते शोधण्याची सरकारची मानसिकता आहे. यावर सरकारचे काम सुरू आहे. विखे-पाटील यांनी एक निवेदन दिले आहे. त्या निवेदनातून काय मार्ग निघू शकतो, याचा सरकार विचार करत आहे. सरकार कोणतीही आडमुठेपणाची भूमिका घेत नाही. सरकार कधीही कोणताही 'इगो' धरत नाही. त्यामुळे त्यातूनही जो काही मार्ग काढता येईल, तो काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. चर्चेसाठी कोणी समोर आल्यास लवकरच चर्चा होईल. सरकार कधीही कुठला ईगो धरत नाही त्याच्यामुळे त्यातूनही जे काही मार्ग काढता येईल तो काढतोय, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### 'तुमच्यामुळे माझी जात हरू नये, न्यायालयाच्या आदेशाचे पालन करायचे आहे'



जरांगे-पाटील म्हणाले की, आपल्याला न्यायालयाच्या आदेशाचे पालन करायचे आहे. आपल्याला शेजारी एक मैदान मोकळं करुन दिलं आहे. तिथे गाड्या लावा आणि मैदानावर झोपा. तुम्हाला आरक्षण पाहिजे नसेल तर तुम्ही गावाकडे जाऊ शकता. मला किती त्रास होत आहे हे तुम्हाला माहिती नाही. तुमच्या लेकराबाळांसाठी मी कष्ट सहन करत आहे. आरक्षण देऊन लेकरांच्या पिढ्यांचा उद्धार करायचा आहे. मला माझी जात मोठी करायची आहे.मला त्रास होत आहे. मला तुमच्यासोबत बोलण्यासाठी पाणी प्यावे लागत आहे. माझी तुम्हाला शेवटची विनंती आहे, मुंबईकरांना त्रास देऊ नका. तुमच्यामुळे माझी जात हरू नये, माझी तुम्हाला शेवटची विनंती आहे. सर्वांनी मैदानात गाड्या लावा आणि झोपा, गावाकडून लोक जेवण पाठवत आहेत, त्यांना आपली काळजी आहे. आपल्याला न्यायालयाच्या नियमाचे पालन करायचे आहे. तुम्ही शांत रहा एवढंच माझं म्हणणं आहे, ज्याला ऐकायचं नाही त्यांनी गावाकडे जा. मराठा आणि कुणबी एकच आहेत. हे अंतिम सत्य असून यावर मी ठाम आहे. भुजबळ यांच्या बोलण्याला मी महत्त्व देत नाही, असा थेट हल्लाबोल जरांगे यांनी भुजबळ यांच्यावर केला.



सातारा : शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे आमदार उत्तम जानकर आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर दरे येथील निवासस्थानी.

## आमदार जानकरांचा 'यू टर्न'; एकनाथभाईंची घेतली भेट;

## प्रसारमाध्यमांना टाळून दरे गावातून घेतला काढता पाय

✔ सातारा : राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे माळशिरसचे आमदार उत्तम जानकर आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात गेल्या काही दिवसांपासून जवळीक वाढताना दिसत आहे. एकनाथ शिंदे यांना कर्णानंतर दुसरा दानूशर असे संबोधून कौतुक करणारे आमदार जानकर यांनी रविवारी (ता. ३१ ऑगस्ट) दरेगावी जाऊन एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. दोघांची बंद खोलीत तासभर चर्चा झाल्याची माहिती आहे, या भेटीची दोघांकडून कमालीची गोपनीयता पाळण्यात आली होती. मात्र, या गोपनीय भेटीची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

- ▸▸ शरद पवार गटाच्या आमदाराची बंद खोलीत तासभर चर्चा;
- ▸▸ सातारा जिल्ह्यातील भेटीबाबत कमालीची राखली गुप्तता
- ▸▸ व्हायरल फोटोवरुन सोलापूर जिल्ह्यात चर्चेचं रगंलं धूमशान
- ▸▸ लढवले जाऊ लागले अनेक तर्क- वितर्क

दरम्यान शरद पवार आणि अकलूजकर मोहिते-पाटील यांचे अत्यंत निकटवर्तीय असलेले आमदार जानकर गुप्तता पाळून एकनाथ शिंदे यांच्या भेटीला गेले. तिथं बंद दाराआड चर्चा केली. याच्या हायरल फोटोवरुन सोलापूर जिल्ह्यात चर्चेचं धूमशान रंगले असून त्यांच्या भेटीबद्दल अनेक तर्क- वितर्क लढवले जाऊ लागले आहेत.

उत्तम जानकर हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तिकिटावर माळशिरस मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले आहेत. निवडणुकीनंतर सोलापूर जिल्ह्यातील पक्षाच्या चार आमदारांनी जयंत पाटील यांच्या माध्यमातून शरद पवार यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत सत्तेत जाण्याची विनंती केली होती. त्याबाबत आमदार जानकर यांनीच माहिती दिली होती.

विकास कामांसाठी निधी आणि नीरा डावा कालव्याच्या आवर्तनावरून उत्तम जानकर यांची सुरुवातीच्या काळात अजितदादा पवार यांच्यासोबत जवळीक निर्माण झाली होती. मात्र, ह्याच जानकर यांनी 'यू टर्न' येत एकनाथ शिंदे यांच्यासोबत नाते जोडल्याचे दिसून येत आहे. आषाढी एकादशीनंतर पंढरपूरच्या दौऱ्यावर आलेल्या एकनाथ शिंदे यांच्या स्वागतासाठी पवारांच्या पक्षाचे आमदार उत्तम जानकर यांनी हजेरी लावली होती. त्या भेटीचीही मोठी चर्चा रंगली होती.

(अधिक वृत्त पान ७ वर...)

### चर्चेचा तपशील गुलदस्त्यात

उत्तम जानकर यांनी एकनाथ शिंदे यांच्या दरेगावातील गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्यासोबत बंद खोली सुमारे एक तासभर चर्चा केल्याची माहिती आहे. या चर्चेची अधिकृत माहिती मिळू शकलेली नाही. मात्र, जानकर यांची शिवसेनेसोबत वाढलेली जवळीकतेची मात्र राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

### चर्चेमधील वाढली मोठी उत्सुकता

एरवी माध्यमांशी दिलखुलासपणे संवाद साधणारे उत्तम जानकर यांनी या वेळी माध्यमांना टाळले. पत्रकार बाहेर जानकर यांची वाट पाहत थांबलेले असताना माध्यमांशी न बोलता जानकर यांनी त्यांना टाळत निघून जाणे पसंत केले. त्यामुळे बंद खोलीत झालेल्या चर्चेबाबतची उत्सुकता वाढली आहे.

### अतिवृष्टीतून मुस्ती येथे वृद्ध शेतकऱ्याची आत्महत्या

✔ सोलापूर : अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाल्यामुळे एका ८० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याने शेतातच गळफास घेऊन आत्महत्या केली. ही यटना मुस्ती (ता.दक्षिण सोलापूर) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. चंद्रकांत गुरुपादप्पा माळगे (वय ८० रा.मुस्ती) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. सोमवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास त्यांनी शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये छताच्या लाकडी वाशाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांना फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मयत चंद्रकांत माळगे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे.अति पावसामुळे शेतातील पिकांचे नुकसान झाले.त्यामुळे त्यांनी निराश होऊन आत्महत्या केली.अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



मृत चंद्रकांत माळगे

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'वाचन संस्कृती' लोप पावत चाललीय!

संगम श्री डे
247-34-590

संगम श्री नाईट
667-91-137

कल्याण
778-25-780

मुंबई
348-54-789

# पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण थांबवण्याची याचिका फेटाळली;

## जुन्या वाहनांवर ए२० इंधनाचा कोणताही परिणाम होत नसल्याचा निर्वाळा

✔ नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या योजनेला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली. या योजनेअंतर्गत, देशात विकल्या जाणाऱ्या पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळले जात आहे. २०२३ मध्ये इथेनॉल मिसळण्यास सुरुवात झाली.सरकारने २०२५-२६ पर्यंत देशातील सर्व पेट्रोल पंपांवर ए२० पेट्रोल उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भारताचे मुख्य न्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. ही याचिका वकील ॲड. अक्षय मल्होत्रा यांनी दाखल केली होती. (अधिक वृत्त पान ७ वर...)



- **इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळण्याचा 'हा' परिणाम :** पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्याने पेट्रोलच्या वापरामुळे होणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. त्याच्या वापरामुळे वाहने ३५ टक्के कमी कार्बन मोनोऑक्साइड उत्सर्जित करतात. इथेनॉल सल्फर डायऑक्साइड आणि हायड्रोकार्बनचे उत्सर्जन देखील कमी करते. इथेनॉलमध्ये ३५ टक्के ऑक्सिजन असल्याने, हे इंधन नायट्रोजन ऑक्साईडचे उत्सर्जन देखील कमी करते.
- **सामान्य माणसाला काय फायदा? :** इथेनॉल मिश्रित पेट्रोलवर चालणारी वाहने पेट्रोलपेक्षा खूपच कमी गरम होतात. इथेनॉलमधील अल्कोहोल लवकर बाष्पीभवन होते, ज्यामुळे इंजिन लवकर गरम होत नाही. याशिवाय, ते कच्च्या तेलापेक्षा खूपच स्वस्त असेल. यामुळे महागाईपासूनही दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.
- **शेतकऱ्यांच्या खिशात २१ हजार कोटी :** इथेनॉलचा वापर वाढल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल. कारण इथेनॉल ऊस, मका आणि इतर अनेक पिकांपासून बनवले जाते. साखर कारखान्यांना उत्पन्नाचा एक नवीन स्रोत मिळेल आणि त्यांचे उत्पन्न वाढेल. इथेनॉलमुळे शेतकऱ्यांना २१ हजार कोटी रुपयांचा फायदा झाला आहे.

